16 APR 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Research by university should benefit farmers, says pro-vice chancellor

Times News Network

**Kolhapur:** Pro-vice-chancellor of Shivaji University, Kolhapur (SUK) D T Shirke in a one-day workshop, on medicinal and scented plants, earlier last week, said that research by the university should benefit farmers.

According to university officials, the workshop was organised with assistance from Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (Rusa) Centre for Natural Products.

CAMPUS BUZZ

For the workshop farmers from Bhudargad, Kagal, Aajara, Belgaum and Sindhudurg were present. The university officials said that participants were given information on medicinal and commercial usage and how they can apply it in farming.

According to the officials, Rs 1.5 crore funding has been distributed from Rusa to SUK's natural products and alternative medicine centre, due to which the centre is equipped with the latest research facilities. The centre contains medicine, cosmetic and nutraceutical facilities.


SUK pro-vice-chancellor D T Shirke delivering his speech at a workshop

**Remote schools celebrate annual gathering:** Remote schools of Vidyamandir Misalvadi, Vidyamandir Dalvewadi and Vidyamandir Jondhalewadi celebrated their annual gathering last week. During the event children presented dance performances. School teachers and villagers were present to encourage the students to participate in extra-curricular activities.

**Winner of essay and poster competition announced:** On the 127th birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar, SUK organised an essay and poster presentation competition.

The competition was organised by the university's Dr Babasaheb Ambedkar Research and Development Centre. Amol Kamble won the first prize in the essay competition, while Tejashri Mohorkar won the first prize in the poster competition.

On the occasion, the centre had also organised a special lecture by Dr Gopal Guru from New Delhi's Jawaharlal Nehru University.

15 APR 2018

लोकसत्ता

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापू

# लोकशाहीत नैतिक मूल्यांचा ऱ्हास होणे चिंतेची बाब - डॉ. गोपाळ गुरु

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**लोकशाहीत नैतिक** मूल्यांचा ऱ्हास होणे ही चिंतेची बाब आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत व नवी दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील प्रा.डॉ. गोपाळ गुरू यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या १२७व्या जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही संकल्पना' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. गुरू म्हणाले,की डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत लोकशाहीत एक व्यक्ती, एक मत याच्या बरोबरीने एक व्यक्ती, एक मूल्य या तत्त्वाला नितांत महत्त्व आहे. माणुसकी हे महत्त्वाचे मूल्य आहे.

ते वृद्धिंगत होण्यासाठीचे प्रयत्न म्हणजे लोकशाही होय. मात्र, सद्यःस्थितीत या मतांचे वस्तूकरण होऊन त्याचे मूल्य बाजारीकरणाच्या माध्यमातून वसूल करण्याचा प्रयत्न दिसतो, तेव्हा त्या मताचे अवमूल्यन तर होतेच, मात्र तिथे नैतिकतेचाही अधःपात, पराभव होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे ज्ञानकोंदणातला हिरा असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या निबंध व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धांचे पारितोषिक वितरणही मान्यवरांच्या हस्ते झाले. त्यांचा निकाल पुढीलप्रमाणेः- निबंध स्पर्धा- अमोल पांडुरंग कांबळे (प्रथम), तेजश्री तेजपाल मोहोरेकर (द्वितिय), प्रशांत उत्तम कांबळे व नवनाथ लोखंडे (तृतीय-विभागून पोस्टर स्पर्धा- तेजश्री तेजपा मोहोरेकर (प्रथम), अमितकुम यशवंतराव कांबळे (द्वितिय तेजस्विनी वसंतराव सला (तृतीय).

या वेळी केंद्राचे संचालक डॉ एस.एस. महाजन यांनी स्वागत प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर यांनी आभा मानले.

# अखंडित विमानसेवेची गरज

कोल्हापूर टाइम्स टीम

कोल्हापूरच्या छत्रपती राजाराम महाराज विमानतळावरून २२ एप्रिलपासून कोल्हापूर ते मुंबई नियमित विमानसेवेला सुरुवात होत आहे. या सेवेमुळे कोल्हापूरच्या विकासाला 'बूस्ट' मिळणार आहे. कोल्हापूरवासीयांच्या वेळ आणि पैशांची मोठी बचत होणार आहे. औद्योगिक, कृषी, वैद्यकीय, पर्यटन, उद्योग, व्यापार-शिक्षण, आय. टी, क्रीडा क्षेत्रांचा सर्वांगीण विकास यातून साधला जाणार आहे. आठवड्यातून तीन दिवस सुरू होत असलेली ही विमानसेवा भविष्यात दररोज सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कोल्हापूरच्या विमानतळावर मुबलक जागा, चांगल्या सुविधा उपलब्ध असल्याने सध्या सुरू होत असलेली १८ सीटर विमानसेवा भविष्यात एटीआर ७२, बोईंग आणि कार्गोकडे वळू शकेल. विमानसेवा टिकविण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असा सूर 'महाराष्ट्र टाइम्स'च्या 'राउंड टेबल'मध्ये विमानक्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला.






## शिक्षणाची कनेक्टिव्हिटी वाढणार



शिवाजी विद्यापीठासाठी विमानसेवा अत्यंत महत्वाची आणि मोलाची ठरणार आहे. विद्यापीठाचे अनेक राष्ट्रीय-आंतराराष्ट्रीय संस्था, विद्यापीठांसोबत सांमजस्य करार आहेत. या करारांनुसार परदेशी विद्यार्थी, संशोधक कोल्हापुरात येतात. विद्यार्थ्यांना कनेक्टिव्हिटी जोडण्यासाठी याचा मोठा फायदा होणार आहे. विद्यापीठाच्या अनेक अधिकाऱ्यांच्या बैठका मुंबई, दिल्ली आणि अन्य ठिकाणी होतात. कोल्हापुरात शिक्षण घेण्यासाठी परदेशातील विद्यार्थी येण्यासाठी तयार आहेत. 'फॅकल्टी एक्स्चेंज प्रोग्रॅम' अंतर्गत अमेरिका, इंग्लड, युरोपसह अन्य देशांतील शिक्षणतज्ज्ञ, संशोधक कोल्हापुरात येऊ शकतात. 'नॅक'च्या संचालकांना विद्यापीठासह कोल्हापूर विभागातील २८३ महाविद्यालयांची पाहणी करण्यासाठी येथे यायचे असते. त्यांना विमानसेवा ही वरदान ठरणार आहे. एआयसीटीई, यूजीसीचे अधिकाऱ्यांना विमानसेवा उपयोगी ठरणार आहे. विद्यापीठातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदांना महत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहू शकतील. इंटरनॅशनल होस्टेलच्या विद्यार्थ्यांना फायदा होऊ शकेल. विमानसेवेमुळे शिक्षणाची कनेक्टिव्हीटी अधिक वाढणार असून 'एज्युकेशन हब' बनेल.

– **डॉ. विलास नांदवडेकर,** कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

